**प्रेस नोट** **दिनांक १८/०४/२०२४**

**सराईत गुन्हेगार अटक करून गुन्हयातील मालमत्ता हस्तगत केलेबाबत...**

दिनांक ११/०१/२०२४ रोजी फिर्यादी नामे संकेत उत्तम बडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.क्र ३७/२०२४, कलम ४१९, ४२० भादवि सह कलम ६६(क), (ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

नमुद गुन्हयाच्या तांत्रिक तपासाच्या आधारे अब्दुल सदावत खान हा आरोपी निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक १६/०४/२०२४ रोजी सांताक्रुझ मुंबई येथुन ताब्यात घेवुन नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाच्या आधारे तपासात ०७ इतर आरोपी निष्पन्न झाले आहेत तसेच अटक आरोपीकडुन नमुद मोबाईल सह इतर आयफोन, वन प्लस, रेड मी नोट ७, सॅमसंग असे एकुण ०६ मोबाईल फोन अशी एकुण ४,७९,७९७/- रूपयांची मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे. यातील आरोपीतावर भांडुप पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद असल्याचा पुर्व अभिलेख आहे. गुन्हयाचा पुढील तपास चालु आहे.

ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उनि नौशाद तांबोळी, सायबर सेलचे पोह अमोल पाटील, गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोशि पगारे, पोनि पाटकर, पोशि. गायकवाड, पोशि सोनवणे यांनी सदरची कामगिरी पार पाडली आहे.

***